वाचले-

१) आदेश क्र.मभां/४/कावि/९१३/२००८ दि.२२/०७/२००८

२) आदेश क्र.मभां/१०/३७७/२०११ दि.१५/१०/२०११

३) मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांचा नोंदणी क्र.मभां/ईनोंक्र.५०५/२०१४ दि.०८/१२/२०१४ अन्वये नोंदणी

४) मभां/७/कावि/७२४/२०१६ दि.१९/०९/२०१६ अन्वये मे. आल्हाट आर्ट स्टडिओ यांना नोटीस

५) मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांचा दि.०२/१०/२०१६ रोजीचा खुलासा

६) मा.आयुक्त सो यांचेकडील दि.१९/१२/२०१६ चा मंजुर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, मध्यवर्ती भांडार विभाग
मभां/७/कावि/२५/२०१६
दिनांक-१६/१२/२०१६

विषय- आषाढी एकादशी पालखी सोहळा २०१६ साठी मुर्ती खरेदी प्रकरणी निविदाकारांना ठेकेदार नोंदणी यादीतून काढून टाकणेबाबत..

आदेश.

उपरोक्त वाचले क्र.१ व २ आदेशान्वये मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांची मनपाच्या भांडार विभागाकडे ई नोंदणीकृत ठेकेदार म्हणून वाचले क्र.३ अन्वये नोंदणी करणेत आलेली आहे. आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ करीता संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतील दिंडीप्रमुखांचा सत्कार करणेकामी विठ्ठल रूख्मीणी मुर्ती खरेदीकामी ई.नि.सु.क्र.९/२०१६-१७ प्रसिध्द केली असता सदर निविदेत नोंदणीकृत ठेकेदार म्हणुन निविदा भरलेली आहे. निविदाधारकांनी निविदेतील अटी शर्तीप्रमाणे निविदेकरीता आवश्यक कागदपत्र सादर करणे बंधनकारक असताना अपुर्ण व दिशाभुल करणारी कागदपत्र सादर केलेली आहेत, तसेच वृत्तपत्रांना चुकीची व दिशाभुल करणारी माहिती देवून मनपाची प्रतिमा मलिन केलेली आहे. त्यामुळे त्यांचेकडून वाचले क्र.४ अन्वये खुलासा मागविणेत आलेला असता तो उपरोक्त वाचले क्र.५ अन्वये प्राप्त झालेला आहे.

मे.आल्हाट आर्ट स्टुडिओ यांनी सादर केलेल्या प्राप्त खुलाशाचे अवलोकन केले असता तो असमाधानकारक, अपुर्ण व दिशाभुल करणारा आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ या आदेशान्वये मे.आल्हाट आर्ट यांना ई निविदा क्र.९/२०१६-१७ मध्ये अपुर्ण व दिशाभुल करणारी कागदपत्रे सादर केल्याने व वृत्तपत्रांना चुकीची व दिशाभुल करणारी माहिती देवून मनपाची प्रतिमा मलिन केली असल्याने महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग -४ दि.०१/१२/२०१६ च्या नियम पुस्तीका प्रकरण-५ मधील ५.४ नुसार वाचले क्र.३ अन्वये करणेत आलेली नोंदणी आदेशाचे तारखेपासून १० वर्षाकरीता रद्द करण्यास मान्यता देत आहे.